# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सायंकाळ

दिनांक 11.02.2019 सोमवार

(गुन्हे)

**1) पो.स्टे. कोतवाली – चोरी :**

दिनांक 04.02.19 चे 1400 वा ते दिनांक 09.12.19 चे 1800 वा चे सुमारास पो.स्टे. कोतवाली हद्दीत काशीबाई देवूळ, जुनी शुक्रवारी, नागपूर येथे राहणा–या फिर्यादी सौ. विद्या प्रमोदराव चुरड, वय 47 वर्ष यांच्या घराच्या उघडया दारातुन कोणीतरी अज्ञात आरोपीने प्रवेश करून लोंखडी अलमारीतील सोन्याचांदीचे दागिने असा एकुण 1,22,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कोतवाली येथे पोउपनि फुलझेले यांनी आरोपी विरूध्द कलम 380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. यशोधरानगर – गंभीर दुखापत करणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत कुंदनलाल गुप्ता नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रोशन विलास वांगन, वय 24 वर्ष हा बिल्डिंग वॉटर प्रुफ चे काम करीत असल्याने तो कामावर गेला नाही ही बाब सहकारी लेबर रोहीत यादव याने फिर्यादीचे मालकास सांगितले. दिनांक 10.02.19 चे 1830 वा ते 1900 वा दरम्यान फिर्यादी याने सहकारी लेबर रोहीत यादव यास मालकास का सांगितले यावरून भांडण करून मारपीट करीत असल्याने वस्तीत राहणारे मोहम्मद अशपाक यांनी दोघांचे भांडण सोडविले. काही वेळाने फिर्यादी आपल्या सासु सुनिता शाहु यांचे घरासमोर उभा असतांना आरोपी मोहम्मद सरवर मोहम्मद अफरोज, वय 20 वर्ष हा येवून फिर्यादीस माझे काका मोहम्मद अशपाक यांचे सोबत भाडण का केले. या कारणावरून फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करून कोणत्यातरी धारदार शस्त्राने मानेवर वार करून गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीच्या सासु या भांडण सोडविण्यासाठी आल्या असता त्यांना त्यांचे उजव्या हाताचे बोटावर शस्त्राने मारून जखमी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. यशोधरानगर येथे पोउपनि भारगव, 9049607970 यांनी आरोपीविरूध्द कलम 326 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

**3) पो.स्टे. जरीपटका – विनयभंग :**

दिनांक 10.02.19 चे 1930 वा चे सुमारास पो.स्टे. जरीपटका हद्दीत राहणा–या 27 वर्षीय फिर्यादी यांचे सांक्षगंधाचा कार्यक्रम सुरू असतांना वस्तीत राहणारा आरोपी क्र. 1) पुनित एकनाथ राउत याने फिर्यादीचा हात पकडुन तु माझे सोबत लग्न का करीत नाही तुझी सगाई होवून देणार नाही. असे म्हटले असता फिर्यादीचे भावाने थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र. 2) सुजित एकनाथ राउत, 3) राकेश एकनाथ राउत, 4) एकनाथ शिवराम राउत यांनी संगणमत करून कार्यक्रमात आरडाओरड करून आरोपी क्र. 1 ते 4 यांनी फिर्यादी व फिर्यादीचे आईला शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच आरोपी क्र. 1 याने फिर्यादीचा हात पकडुन पेन्डाल जवळ नेवून फिर्यादी व फिर्यादी सोबत लग्न करणारे यांना जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिली व कार्यक्रमाचे सामान फेकफाक करून तयार असलेले जेवन फेकुन नुकसान केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोउपनि खांडेकर, 8329288805 यांनी आरोपीविरूध्द कलम 354 (अ),(1)(1),354(ब),504,506(ब),452,427,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

4) पो.स्टे. नविन कामठी – प्राणांतिंक अपघात :

दिनांक 10.02.19 चे 1900 वा चे सुमारास कमलेश नाशीकेत भवते, वय 38 वर्ष, रा. वेलकम सोसायटी, काटोल नाका, नागपूर हा आपली मारोती व्हॅन क्र. एमएच/31/एफई/2459 ने आपल्या परिवारासह व मित्रांचे परिवारासह बिनासंगम येथून पिकनिक करून येत असतांना पो.स्टे. नविन कामठी हद्दीत बायपास रोड कंन्टोमेन्ट एरिया, येथे टाटा सुमो क्र. एमएच/14/एएम/385 च्या अनोळखी आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून ओमनी व्हॅनला समोरून धडक मारून व्हॅन मध्ये बसलेल्या लोकांना गंभीर जखमी करून कमलेश याचे मरणास कारणीभूत ठरला. याप्रकरणी फिर्यादी मिलिंद हरीभाउ मेश्राम, वय 36 वर्ष रा. पंचशिल नगर, काटोल रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नविन कामठी येथे पोहवा सुभाष गजभिये, 9422549505 यांनी आरोपी चालकाविरूध्द कलम 279,304(अ),337,338,427 भादंवि सहकलम 184,134 मोवाका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

5) पो.स्टे. शांतीनगर – घरफोडी :

दिनांक 09.02.19 चे 1930 वा ते दिनांक 11.02.19 चे 1030 वा दरम्यान पो.स्टे. शांतीनगर हद्दीत प्लॉट नं. 8, प्रेमनगर, झेंडा चौक, साई नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रोशन श्रावण पेठे, वय 31 वर्ष हे आपल्या परिवारासह भुईगाव कुही येथे साक्षगंध कार्यक्रमाकरीता घराला कुलूप लावून गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश करून आलमारीचे लॉक तोडून त्यामधील सोन्याचांदीचे दागिने व नगदी 61,000 रू असा एकुण 1,02,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. शांतीनगर येथे सपोउपनि तिवारी, 9823036346 यांनी आरोपी कलम 454,457,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(अकस्मात मृत्यू)

पो.स्टे गिट्टिखदान, हुडकेश्वर, अंबाझरी, बेलतरोडी, हिंगणा :

1) गिट्टिखदान – दिनांक 10.02.19 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे. गिट्टिखदान हद्दीत जगदीश नगर, काटोल रोड, नागपूर येथे राहणारे जीवन सुरेद्र बिजेवार, वय 20 वर्ष याने आपले राहते घरी गळफास लावल्याने त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. गिट्टिखदान येथे सपोनि पाटील, 9689949828 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

2) हुडकेश्वर – दिनांक 03.02.19 चे 2330 चे सुमारास पो.स्टे. हुडकेश्वर हद्दीत न्यु सुभेदार ले आउट, प्लॉट नं. 76, नागपूर येथे राहणारे हेमंत विजयराव जिराफ, वय 26 वर्ष याने स्वतः जाळून घेतले असता त्याला उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे भरती केले उपचारादरम्यान दिनांक 11.02.19 चे 0700 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे पोउपनि निळकंठे, 8983560305 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

3) अंबाझरी – दिनांक 10.02.19 चे 2215 वा चे सुमारास पो.स्टे. अंबाझरी हद्दीत जय नगर पांढराबोडी, नागपूर येथे राहणारी तनवी विवेक देशमुख, वय 18 वर्ष हिने आपले राहते घरी सिलिंग फॅनला ओढणिच्या सहायाने गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. अंबाझरी येथे सपोउपनि मेश्राम, 9552557006 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

4) बेलतरोडी – दिनांक 10.02.19 चे 2230 वा ते दिनांक 11.02.19 चे 0700 वा दरम्यान पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत प्लॉट नं 7, गोंडवाना नगर, रियालन्स फ्रेश जवळ, मनिष नगर, नागपूर येथे राहणारे विजय दशरथ गावंडे, वय 44 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो. स्टे. बेलतरोडी येथे पोहवा संजय हुड, 9823364082 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

5) हिंगणा – दिनांक 11.02.19 चे 0136 वा चे पुर्वी पो.स्टे. हिंगणा हद्दीत नविन गुमगाव वाघधरा, नागपूर येथे राहणारे विनोद महादेव देवगडे, वय 42 वर्ष यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय हिंगणा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी सौ. जयमाला विनोद देवगडे, वय 34 वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. हिंगणा येथे सपोउपनि अनिल धानोरकर, 9422104287 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

<u>(ईतर)</u>

<u>1) गुन्हे शाखा युनिट क्र 3 पोलीसांची कामगिरी :</u>

दिनांक 01/02/2019 चे 16.00 वाजता सुमारास आरोपी क्र. 1) दिपक कन्हैयालाल तलरेजा, वय 37 वर्ष, रा. हेमु कॉलनी चौक, जरीपटका, नागपूर, क्र. 2) राजेश उर्फ संत धरमदास लखनानी, वय 30 वर्ष, रा. मेकोसाबाग, नागपूर हे चितळे फुडस कंपनीचे नावाचे (इंन्स्टंट गुलाब जामून मिक्स) प्रॉडक्ट पॅकेजींग खोटे व बनावट तयार करून त्याची इतर रिटेलरला विक्री करून स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता चितळे फूडस् कंपनीची धोखाधडी करून फसवणुक केली आहे. तसेच चितळे फुडस हे अग्रगण्य कंपनी व लोकप्रिय फुडस् कंपनीचे डुप्लीकेट प्रॉडक्ट तयार करून कंपनीची बदनामी केल्याने नमुद वाहेगुरू ट्रेडर्स चे मालक नामे कैलाश राखेजा याचे विरूध्द फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून कलम 420,468 भादंवि सह कलम 51,63 कॉपी राईट ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे तपासा दरम्यान पाहीजे असलेला मुख्य आरोपी कैलास दिपक कन्हैयालाल तलरेजा, वय 37 वर्ष, रा. हेमु कॉलनी चौक, जरीपटका नागपूर शहर यांस दिनांक 08/02/2019 रोजी अटक करून त्याचा पिसीआर प्राप्त करण्यात आला. पिसीआर दरम्यान अटक आरोपी कडुन बनावटी चितळे फुड्स इंन्स्टंट गुलाब जामुन मिक्स पावडर तयार करण्याकरिता उपयोगात येणारे साहित्य ज्यामध्ये मैदा, डालडा, तेल, दुधपावडर, बेकींग पावडर, सायट्रिक ॲसिड, टब, पॅकिंग मशिन, शिलाई मशिन, इलेक्ट्रीक वजन काटा, लोखंडी चाळणी, मिक्सर पॉट सह, लोखंडी कटोरे–मग, प्लास्टीक टोपले, चमचा, कैची, चितळे कंपनीचे पाउच, चितळे कंपनीची टेप पटटी इ.असा एकूण 1,73,585 रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला. तसेच सदर गुन्हयातील बनावटी चितळे फुड्स इंन्स्टंट गुलाब जामून मिक्स पावडर विक्री करण्यास मदत करणारा व पाहीजे असलेला आरोपी राजेश उर्फ संत लखनानी रा. मेकोसाबाग, नागपूर यास सुध्दा अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पूढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. संभाजी कदम, मा.सहापोलीस आयुक्त संजीव कांबळे, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट 3 मधील पोनि जग्वेंन्द्रसिंग राजपूत, सपोनि ज्ञानेश्वर भेदोडकर, मपोउपनि मंगला मोकाशे, सफौ राजेंन्द्र बघेल, पोहवा शत्रृघ्न कडू, शैलेष ठवरे, अनिल दुबे, सुरेश हिंगणेकर, नापोशि श्याम कडू, अतुल दवंडे, पोशि मिलींद नारसन्ने, चालक/शरीफ शेख, फिरोज शेख यांनी केली आहे.




<u>2) पो.स्टे. तहसिल पोलीसांची कामगिरी :</u>

फिर्यादी पुखराज रामनिवासजी बग, वय 73 वर्ष रा. देशपांडे ले आउट प्लॉट नं. 395 एनआयटी गार्डन जवळ, पो.स्टे. लकडगंज नागपूर हे दिनांक 10.02.19 चे 2100 वा ते दिनांक 11.02.19 चे 0530 वा दरम्यान मंदिरातील नियोजित ठिकाणी ठेवलेली दानपेटी दिसुन आली नाही. त्यांनी सदर दानपेटीचा शोध आजुबाजुला घेतले असता ती दानपेटी मंदीराच्या मागील बाजुस असलेले झाडीमध्ये दिसली. त्या दानपेटीचे लॉक व कडीकोंडा तुटलेला होता. त्यामधील चढाव्याची रक्कम कोणीतरी आज्ञात

चोरटयाने चोरून नेली करीता फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा कलम 457,380 भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोस्टे हद्यीत नमुद गुन्हयाच्या शोध कामी असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक संशयित ईसम वय 20 वर्ष ज्याने अंगात काळा शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट परिधान केलेला ईसम ज्याच्या खांद्यावर एक लगेज बॅग काळया रंगाची लटकलेली असा ईसम ईतवारी रेल्वे स्टेशनच्या मार्गावर पायी गेला अशी माहिती प्राप्त झाल्याने लगेच आम्ही आमचे वाहनाने गेलो असता ईतवारी रेल्वे स्टेशन नागपूर येथे गेट जवळ माहिती प्रमाणे दिसुन आला. त्यास स्टापच्या मदतीने ताब्यात घेवून आमचा परिचय देवू त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव धनराज क्रिष्णा यादव सांगितले व गुन्हयाबाब विचारले असता उडवाउडवीचे उत्तर देवून लागल्याने त्याची अंगझडती घेतली असता त्याचे बॅगमध्ये चोरीची रोख 24,740 रू मिळून आली व त्याने घटनास्थवरील चोरी केल्याचे कबुल केले.

सदरची कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, परि. क्र. 3 श्री राहुल माकणीकर, मा. सहापोलीस आयुक्त, श्री राजरत्न बनसोड, कोतवाली विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि वैभव जाधव, सपोनि रामदस पटील, सपोउपनि शिवसागर मिश्रा, पोहवा समीर नापोशि प्रविण, पोशि सचिन, प्रविण यांनी केली आहे.

**3) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–**

नागपूर शहरात आज दि. 11.02.2019 रोजी मा. पोलीस उपआयुक्त, (आर्थिक), श्रीमती श्वेता खेडकर, या नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर